**सह-वीज प्रकल्प आस्थापित करणा-या साखर कारखान्यांना ऊस खरेदी करात सूट देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,

शासन निर्णय क्र.अपाऊ-२०१२/प्र.क्र.४९/ऊर्जा-७

दिनांक :- १३ फेब्रुवारी,२०१३.

संदर्भ:- १) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.अपाऊ-२००७ प्र.क्र.६९३/ऊर्जा-७, दिनांक १४/१०/२००८

२) शासन शुध्दीपत्रक,उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.अपाऊ- २००७/ प्र.क्र.६९३-अ/ऊर्जा-७, दिनांक २७/१/२००९

३) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.अपाऊ-२००९/ प्र.क्र.१५२८/ऊर्जा-७, दिनांक ३ ऑगस्ट, २००९.

४) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.पवन- २०१०/ प्र.क्र.१३४/ऊर्जा-७, दिनांक १४/०७/२०१०.

५) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.अपाऊ-२०१०/ प्र.क्र.३६०/ ऊर्जा-७, दिनांक ३/३/२०११.

**प्रस्तावना:-**

राज्य शासनाच्या "अपारंपरिक ऊर्जा स्त्रोत्रांपासून ऊर्जा निर्मितीचे नवीन धोरण – २००८" अंतर्गत संदर्भातील आदेशान्वये, सह-वीज/वीज निर्मिती प्रकल्प आस्थापित करणा-या साखर कारखान्यांना गाळपासाठी येणाऱ्या ऊसाच्या खरेदीच्या करात १०० % सूट १० वर्षासाठी देण्यात आली आहे. याबाबतच्या कार्यवाहीची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणींचा विचार करुन खालील नमूद पूरक अटी व शर्ती प्रचलित शासन निर्णयातील अटी व शर्तींबरोबर लागू करण्यासंदर्भात शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

सन २००६-०७ पूर्वी सह-वीज निर्मिती प्रकल्प आस्थापित करणा-या सहकारी साखर कारखान्यांना, सन २००६-०७ पासून व त्यानंतर कार्यान्वित झालेल्या प्रकल्पांच्या बाबतीत प्रकल्प कार्यान्वित झाल्यापासून सलग दहा वर्षांकरिता गुंतवणुकीच्या कमाल मर्यादेपर्यंतच ऊस खरेदी करातून सूट उपलब्ध असेल. सदर सूट, सन २००६-०७ पासून कार्यान्वित केलेल्या खाजगी आणि बूट (BOOT) तत्वावरील सहकारी साखर कारखान्यांच्या प्रकल्पांच्या बाबतीत कार्यपध्दती विहित केल्यापासून (दि.१४ जुलै, २०१० पासून) आणि दिनांक १४ जुलै, २०१० नंतर आस्थापित झालेल्या प्रकल्पांच्या बाबतीत, प्रकल्प कार्यान्वित झाल्यापासून देय राहील.

२. सदर सूट उपभोगण्यासाठी खालील अटी व शर्तींची अंमलबजावणी होणे आवश्यक राहील -

१)महावितरण कंपनीस ६ मे.वॅ. वा त्यापेक्षा अधिक अतिरिक्त पारेषित वीज उपलब्ध करुन देण्याची क्षमता संबंधित प्रकल्पाची असणे आवश्यक आहे.पारेषित केलेली अतिरिक्त वीज किमान ७५लाख युनिट असणे आवश्यक आहे

२) संबंधित प्रकल्पाची गुंतवणूकीची कमाल मर्यादा रु.५.०० कोटी प्रती मे.वॅ. इतकी राहील.याकरिता झालेली गुंतवणूक साखर आयुक्तालय व सनदी लेखापालाकडून प्रमाणित करुन सादर करणे आवश्यक राहील. तसेच, या अंतर्गत मिळणाऱ्या लाभाची रक्कम सहवीज निर्मिती प्रकल्पाच्या एकूण भांडवली गुंतवणूकी इतकी होईपर्यन्त अथवा १० वर्षाचा कालावधी पूर्ण होईपर्यन्त यापैकी प्रथम होणाऱ्या घटनेपर्यन्त लागू राहील. यासाठी कारखान्याने प्रत्येक वर्षी विक्रीकर विभागाकडून या अंतर्गत मिळालेल्या लाभाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

३) टॉपिंग सायकल कार्यक्षमता ४५ टक्के व त्यापेक्षा अधिक असणाऱ्या प्रकल्पांना ही सूट अनुज्ञेय होईल. त्यासाठी संबंधित प्रकल्पांनी वसंतदादा शुगर इन्स्टिटयूट यांचेकडील प्रमाणपत्र दरवर्षी सादर करणे आवश्यक राहील.

४) यापूर्वी ऊस खरेदी कराची सूट जाहीर केलेल्या वर्षाचा / गाळप हंगामाचाही समावेश या सलग १० वर्षाच्या / गाळप हंगामाच्या कालावधीमध्ये विचारात घेतला जाईल. यासंबंधी विक्रीकर विभाग यांचेकडून आवश्यक संनियंत्रण केले जाईल.

५) साखर कारखान्याने दरवर्षी ऊस गाळपासंबंधी साखर आयुक्तालयाकडील प्रमाणित माहिती महाऊर्जाकडे / संबंधितांकडे सादर करावी.

६) ऊस खरेदी कराच्या सवलतीसाठी विहित करण्यात आलेली अतिरिक्त सहवीज पारेषित करण्याची तसेच किमान वीज क्षमतेची अट ही कारखानानिहाय लागू राहील.

७) सदर सूट देय आहे किंवा नाही याबाबतचे आवश्यक प्रमाणपत्र महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणाने (महाऊर्जाने) विक्रीकर विभागास उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे. महाऊर्जाने सदर प्रमाणपत्र गाळप हंगाम संपल्यानंतर आणि अर्जदाराने सर्व आवश्यक कागदपत्र सादर केल्यानंतर जास्तीत जास्त ३ महिन्याच्या कालावधीमध्ये द्यावे. सदर प्रमाणपत्र, वित्त विभाग / विक्रीकर विभागास यासोबतच्या जोडपत्र अ प्रमाणे विहित नमुन्यामध्ये द्यावे. या पूर्वीच्या गाळप हंगामाबाबत असे प्रमाणपत्र महाऊर्जाने संबंधित यंत्रणेला तात्काळ उपलब्ध करुन द्यावे.

८) सहवीज निर्मिती प्रकल्प आस्थापित करणाऱ्या संबंधित साखर कारखान्यांना ऊस खरेदी करायी सवलत उपभोगण्यासाठी प्रकल्पातील ६ मे.वॅ.वा त्यापेक्षा अधिक अतिरिक्त पारेषित वीज, केवळ महावितरण कंपनीशी वीज खरेदी करार करुन, त्याप्रमाणे महावितरण कंपनीस प्रत्यक्षात वीज पुरवठा करणे आवश्यक आहे.

९) संदर्भाधीन क्रमांक-५ वरील दि.३ मार्च, २०११ च्या आदेशामध्ये नमूद केलेल्या २, ३, व ४ या अटी व शर्ती वगळण्यात / वरीलप्रमाणे सुधारण्यात येत आहेत.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१/करा-३, दिनांक १४. १.२०१३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक : 201302131600092010 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

स्मि.श.रानडे

(स्मि.श.रानडे)
शासनाच्या उपसचिव

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई

२. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई